# सिंधुदुर्ग बँक

सिंधुदुर्ग जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि., सिंधुदुर्ग

**SINDHUDURG BANK**

Sindhudurg District Central Co-op. Bank Ltd., Sindhudurg

प्रधान कार्यालय सिंधुदुर्गनगरी - ४१६ ८१२ HEAD OFFICE SINDHUDURGNAGARI - 416812

Telegram : सिंधुबँक ☏ अध्यक्ष - २२९००२, उपाध्यक्ष - २२९००१, मुख्य कार्यकारी अधिकारी - २२९००३, फॅक्स (०२३६२) २२९००४ (प्रशासन) २२९०१३ (लेखा)

EPABX : २२९००५ ते २२९०१० सर्व विभाग E mail : ho@sindhudurgdcc.com


Ref No.: Date :

## वेबसाईटवर प्रसिध्द करावयाचा तपशिल

### सिंधुदुर्ग जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक शिपाई भरतीची जाहिरात

**सिंधुदुर्ग जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि., सिंधुदुर्ग** या बँकेत **शिपाई नोकरभरती** या श्रेणीतील ३२ पदे भरावयाची आहेत. त्यासाठीची भरती प्रक्रिया कोल्हापूर जिल्हा नागरी बँक्स सहकारी असोसिएशन लि., कोल्हापूर या भरती एजन्सीमार्फत राबविली जाणार आहे. याकरीता पात्र उमेदवारांकडून विहित नमुन्यात केवळ ऑनलाईन पध्दतीने असोसिएशनच्या **www.kopbankasso.co.in** या अधिकृत संकेतस्थळावर (वेबसाईट) अर्ज मागविणेत येत आहेत.

| अनु. | तपशिल | दिनांक |
|---|---|---|
| १. | संकेतस्थळावर अर्ज भरणे. | दि.२०/०८/२०२६ ते दि.३०/०८/२०२६ |
| २. | शैक्षणिक पात्रता | मान्यताप्राप्त मंडळाची किमान १२ वी परिक्षा उत्तीर्ण |
| ३. | वयोमर्यादा | २१ ते ४० वर्षे (दि.३०.०८.२००५ नंतरचा व दि.३०.०८.१९८६ यापूर्वीच्या जन्मतारखेच्या उमेदवारांना अर्ज करता येणार नाही.) |
| ४. | रहिवास ( अधिवास ) दाखल्याबाबत | उमेदवार हा सिंधुदुर्ग जिल्हयातील रहिवाशी असणे आवश्यक आहे. त्यास सक्षम प्राधिकाऱ्याने निर्गमित केलेले अधिवास प्रमाणपत्र **(Domicile Certificate)** हे शैक्षणिक कागदपत्रासोबत अपलोड करणे अनिवार्य आहे. |
| ५. | परीक्षा शुल्क | रू.६००/- (जीएसटीसह) विना परतीची **(Non Refundable)** |
| ६. | परीक्षा शुल्क स्विकारण्याचा अंतिम दिनांक | दि.३०.०८.२०२६ पर्यंत (रात्री २३.५९ वाजेपर्यंत ) |
| ७. | लेखी परीक्षा दिनांक (परीक्षा पध्दत ऑफलाईन ) | रविवार दि.०६ सप्टेंबर, २०२६ |
| ८. | लेखी परीक्षा प्रवेशपत्र डाऊनलोड करण्याचा दिनांक | दि.०२.०९.२०२६ ते ०५.०९.२०२६ |

- उपरोक्त पदासाठी परिविक्षाधिन कालावधी, वेतन, निवड पध्दती, अटी व शर्ती, ऑनलाईन अर्ज भरण्याची पध्दत इत्यादी बाबतची विस्तृत माहिती असोसिएशनच्या **www.kopbankasso.co.in** या अधिकृत संकेतस्थळावर (वेबसाईट) दि.२०.०८.२०२६ ते दि.३०.०८.२०२६ पर्यंत पहावयास उपलब्ध राहील.
- परीक्षा शुल्काची रक्कम ऑनलाईन पेमेंट मोडद्वारे भरावयाची आहे. परीक्षा शुल्क भरणा केल्याशिवाय व पूर्ण फॉर्म भरल्याशिवाय रजिस्टेशन प्रक्रिया पूर्ण होणार नाही. संकेतस्थळावर ऑनलाईन पध्दतीने भरलेले अर्ज ग्राहय धरले जातील अन्य कोणत्याही प्रकारचे अर्ज ग्राहय धरले जाणार नाही.
- ऑनलाईन अर्ज भरताना शैक्षणिक पात्रता, वय, रहिवास (अधिवास) प्रमाणपत्र **(Domicile Certificate)** स्वत:चा ईमेल आयडी, मोबाईल क्रमांक व आधारकार्ड क्रमांक अचूक भरणे आवश्यक आहे. एकदा भरलेल्या अर्जामध्ये दुरूस्ती करता येणार नाही.
- उमेदवारास ऑनलाईन अर्ज भरणे अनुषंगाने काही शंका असल्यास त्यांनी एजन्सीच्या **help@kopbankasso.co.in** या ईमेलवर अथवा **९०७५४१४६६१** या मोबाईल नंबर वर संपर्क साधावा.
- सदर संकेतस्थळावर भरती प्रक्रियेच्या दरम्यान वेळोवेळी भेट देवून भरती प्रक्रियेची माहिती अद्यावत अवगत करण्याची जबाबदारी उमेदवाराची राहील.

**ठिकाण – सिंधुदुर्गनगरी**
**दिनांक – २०.०८.२०२६**

**अनिरूध्द यशवंत देसाई**
**मुख्य कार्यकारी अधिकारी**
**सिंधुदुर्ग जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि., सिंधुदुर्ग**

# शिपाई पदाची भरती प्रक्रिया नियमावली खालीप्रमाणे

शासनाच्या निर्देशानुसार बँकेमधील शिपाई भरती पदे पारदर्शक, गुणवत्तापुर्ण, न्याय व निर्देशानुसार भरण्यासाठी ही नियमावली तयार करण्यात येत आहे. शासनाचे दि.०६ जुलै २०२६ रोजी जारी केलेल्या शासन निर्णयामध्ये शिपाई पदासाठी ऑफलाईन भरती प्रक्रिया राबविण्याची तरतूद असून, त्यानुसार पारदर्शक भरती प्रक्रिया राबविणेची आहे.

**शिपाई ३२ पदांसाठी भरतीबाबत आवश्यक तपशिल**

<table>
<tr><th>अ.क्र.</th><th>तपशिल</th><th>शेरा</th></tr>
<tr><td>१</td><td>उमेदवाराची शैक्षणिक पात्रता</td><td>मान्यताप्राप्त मंडळाचे किमान १२ वी परिक्षा उत्तीर्ण प्रमाणपत्र अपलोड करणे आवश्यक आहे व इतर शैक्षणिक माहिती ऑनलाईन भरावयाची आहे.</td></tr>
<tr><td>२</td><td>उमेदवाराची वर्यामर्यादा</td><td>२१ ते ४० वर्षे (दि.३०.०८.२००५ नंतरचा व दि.३०.०८.१९८६ यापूर्वीच्या जन्मतारखेच्या उमेदवारांना अर्ज करता येणार नाही.)</td></tr>
<tr><td>३</td><td>रहिवास ( अधिवास ) दाखल्याबाबत</td><td>उमेदवार हा सिंधुदुर्ग जिल्हयातील रहिवाशी असणे आवश्यक आहे. त्यास सक्षम प्राधिकाऱ्याने निर्गमित केलेले अधिवास प्रमाणपत्र (Domicile Certificate) हे शैक्षणिक कागदपत्रासोबत अपलोड करणे अनिवार्य आहे.</td></tr>
<tr><td>४</td><td>परीक्षा शुल्क</td><td>रू.६००/- (जीएसटीसह) विना परतीची (Non Refundable)</td></tr>
<tr><td>५</td><td>ऑफलाईन परिक्षेसाठीचा अभ्यासक्रम</td><td>सहकार, सामान्यज्ञान, चालू घडामोडी, मराठी भाषा ज्ञान, बुध्दीमापन चाचणी इत्यादी विषयावरील प्रश्नांचा समावेश असेल.</td></tr>
<tr><td>६</td><td>परिक्षेचे स्वरूप व निवड पध्दती</td><td>१. परिक्षेचा कालावधी ७५ मिनिटांचा राहील.<br>२. परिक्षा वस्तुनिष्ठ व बहुपर्यायी स्वरूपाची असेल.<br>३. लेखी परिक्षा ७० गुणांची राहील व प्रत्येक प्रश्नास १ गुण रहिल.<br>४. तोंडी परिक्षा ३० गुणांची राहिल. त्याचा तपशिल खालीलप्रमाणे
<table>
<tr><th>अ.क्र.</th><th>तपशिल</th><th>गुण</th></tr>
<tr><td>१</td><td>आवश्यक पात्रतेपेक्षा जादा शैक्षणिक पात्रता</td><td>५</td></tr>
<tr><td>२</td><td>संवाद कौशल्य अभिव्यक्ती</td><td>५</td></tr>
<tr><td>५</td><td>जिल्हा बँकेच्या कामकाजाचा अनुभव</td><td>२०</td></tr>
<tr><td></td><td>एकूण</td><td>३०</td></tr>
</table>
५. लेखी परिक्षेतील उत्तीर्ण उमेदवारांची तोंडी मुलाखत बँकेमार्फत घेतली जाईल.</td></tr>
<tr><td>७</td><td>ऑनलाईन अर्ज भरण्याचा कालावधी</td><td>दि.२०/०८/२०२६ ते दि.३०/०८/२०२६ रोजी पर्यंत</td></tr>
<tr><td>८</td><td>परिक्षा पध्दती</td><td>ऑफलाईन</td></tr>
<tr><td>९</td><td>सुरूवातीस देय पगार</td><td>रू.१४,०००/-(परिविक्षा कालावधी(Probation Period)- १८ महिने राहील.</td></tr>
<tr><td>१०</td><td colspan="2">शिपाई पदाच्या भरतीबाबत अटी व शर्थी अथवा इतर कोणतेही बदल करण्याचे अधिकारी एजन्सी यांना राहतील.</td></tr>
<tr><td>११</td><td colspan="2">उमेदवाराकडून कोणत्याही प्रकारच्या शिफारशी अथवा दबाव तंत्र, गैरप्रकार यास प्रतिबंध राहील. परिक्षा केंद्रावर उमेदवारांकडून कोणताही गैरप्रकार आढळल्यास उमेदावारास अपात्र करता येईल.</td></tr>
<tr><td>१२</td><td colspan="2">लेखी परिक्षेत उत्तीर्ण झालेल्या उमेदवारांमधून १:३ प्रमाणात मुलाखतीस पात्र असलेल्या उमेदवारांची यादी अर्ज केलेल्या असोसिएशनच्या संकेत स्थळावर व बँकेच्या वेबसाईटवर (संकेतस्थळावर) तसेच बँकेच्या नोटीसबोर्डवर प्रसिध्द केली जाईल.</td></tr>
</table>

| | |
|---|---|
| १३ | मुलाखतीच्यावेळी कागदपत्रांची पडताळणी केली जाईल व कागदपत्र पडताळणीमध्ये पात्र झालेल्या उमेदवारांची मुलाखत घेतली जाईल. उमेदवार मुलाखतीस गैरहजर राहिल्यास तो अंतिम निवडीस अपात्र ठरेल. |
| १४ | लेखी परिक्षेचे गुण व बँकेने घेतलेल्या तोंडी मुलाखतीचे गुण अशा एकत्रित गुणांनुसार निवड झालेल्या अंतिम उमेदवारांची यादी बँकेच्या व असोसिएशनच्या वेबसाईटवर (संकेतस्थळावर)प्रसिध्द केली जाईल.रिक्त पदांच्या २० % प्रमाणे उमेदवारांची प्रतिक्षा यादी तयार करण्यात येईल. सदर प्रतिक्षा यादीचा कालावधी हा अंतिम निवड यादी जाहिर झाल्याच्या दिनांकापासून १ वर्षाचा राहील. |
| १५ | अंतिम निवड सुचीतील उमेदवारांना बँकेच्या प्रचलित अटी शर्तीनुसार नियुक्ती देण्यात येईल. |

तरी इच्छुक उमेदवारांनी **www.kopbankasso.com.in** या वेबसाईटवर विहित वेळेत ऑनलाईन परिक्षा शुल्क भरून ऑनलाईन अर्ज सादर करावेत. उपरोक्त पदासाठी उपरोक्त वेबसाईटव्दारे ऑनलाईन अर्ज करावयाचे आहेत. अन्य कोणत्याही पध्दतीने प्राप्त झालेल्या अर्जाचा व फीचा विचार केला जाणार नाही याची नोंद घ्यावी.

## ऑनलाईन पध्दतीने अर्ज सादर करण्याची प्रक्रिया

१. अर्ज करण्याची पध्दत –ऑनलाईन अर्ज सादर करणेबाबत सविस्तर सुचना www.kopbankasso.com.in या वेबसाईटवर उपलब्ध आहे. उमेदवार त्याचा अर्ज इंटरनेट सुविधा असलेल्या ठिकाणी भरू शकेल.

२. परिक्षा शुल्क फक्त ऑनलाईन पेमेंट माध्यमातूनच भरावे लागेल. परिक्षा शुल्क भरणे अनिवार्य आहे. न भरल्यास उमेदवारास अपात्र करण्यात येईल. ऑनलाईन पेमेंट अपडेट होणेकरीता २४ ते ४८ तास लागू शकतात. उमेदवारांचे पेमेंट अपडेट झाल्यानंतर त्यांनी अर्जाची प्रत आपल्याकडे संभाळून ठेवावी.

३. उमेदवार शिपाई पदाचे शारीरीक हालचालीचे कामकाज करणेकरीता शारीरीकदृष्टया सक्षम/सुदृढ असणे आवश्यक आहे.

४. अर्ज भरण्यापुर्वी उमेदवाराने खालीलप्रमाणे नजिकच्या काळातील छायाचित्र व स्वाक्षरी ईमेज सॉफ्टकॉपी स्वत:कडे ठेवावी.

| विषय | साईज लिमिट | तपशिल |
|---|---|---|
| अर्जदाराचे अलिकडील पासपोर्ट छायाचित्र | JPEG FORMAT मधील 20 KB पर्यंत | लांबी X रूंदी प्रमाण (Proportion) 3.5c.m.*4.5 c.m. असावे. छायाचित्र समोरून चेहऱ्याचे असावे. छायाचित्राचा ७५ % भाग चेहरा असावा. |
| अर्जदाराची स्वाक्षरी | JPEG FORMAT मधील 20 KB पर्यंत | कोऱ्या पांढऱ्या कागदावर गडद जाड पॉईंट पेनने स्वाक्षरी करावी. 2.5c.m.*1.5 c.m. असावे. |

५. उमेदवाराचा फोटो व सही ऑनलाईन अर्ज भरताना अपलोड करणे आवश्यक आहे. अर्जातील सर्व माहिती भरणे बंधनकारक आहे.

६. अर्जदाराने अपलोड केलेली ईमेज सुस्पष्ट नसल्यास त्यास अपात्र ठरविले जाऊ शकते याची नोंद घ्यावी.

७. सदर पेजवरील सर्व माहिती भरल्यानंतर व छायाचित्र आणि स्वाक्षरी अपलोड केल्यानंतर Submit यावर Click करावे.

८. अर्जात भरलेली माहिती परिपुर्ण असल्यास येणाऱ्या मेसेज बॉक्समध्ये भरतीप्रक्रियेतील पुढील बाबींची (उदा.अर्जाची पात्रता पहाणे, प्रवेशपत्र काढणे, जन्मतारीख वगैरे) माहिती अचूक असल्याची खात्री करावी.

९. अर्जात भरलेली माहिती परिपुर्ण असल्याची खात्री असल्यास अथवा चुकीची माहिती दुरूस्त करून अचुक भरल्यानंतर Save & Continue यावर क्लिक करावे. त्यानंतर अर्जाचा आयडी ऑनलाईन परिक्षा शुल्क भरण्याची अथवा विहित केलेले परिक्षा शुल्क जमा करण्याची अंतिम तारीख याबाबतची माहिती उमेदवारांस दिसेल.

१०. तयार झालेले Form ID भरतीच्या संपुर्ण प्रक्रियेत उपलब्ध असल्याने तो उमेदवारासंनी संभाळून, जतन/ नोंद करून ठेवावा. यानंतर अर्जात भरलेली माहिती उमेदवाराला बदलता येणार नाही.

११. उमेदवारांनी अर्जात नमूद केलेली सर्व माहिती व तपशिल अचुक असून, कोणतीही माहिती अथवा तपशिल चुकीचा अथवा खोटा आढळल्यास अर्ज कोणत्याही टप्यावर रद्द करणेत येईल, याची नोंद घ्यावी. असे प्रतिज्ञापत्र मान्य करून Submit my Form यावर Click करावे व त्यानंतर अर्ज सादर होईल.

१२. त्यानंतरच्या Page वर Form ID व Mobile No. ही माहिती भरून प्रिंट रिसिटवर क्लिक केल्यानंतर उमेदवाराच्या अर्जाची पोच पावती उपलब्ध होईल.,

१३. ई-मेल प्राप्त झाल्यावर उमेदवार Form ची पोहोचपावती काढून घेऊ शकतो.

१४. अपात्र ठरलेल्या अर्जाच्या बाबतीत आक्षेप असल्यास hepl@kopbankasso.co.in या ईमेलवर अथवा ९०७५४१४६६१ या मोबाईल नंबरवर संपर्क करावा.

१५. ऑफलाईन परिक्षा उमेदवाराचे कोणतेही कागदपत्र तपासणी न करता घेतली जाणार असल्याने नंतर कागदपत्रामध्ये त्रृटी आढळल्यास, केवळ ऑफलाईन परिक्षेस बसू दिले या कारणास्तव उमेदवारास निवड करणे अनुषंगाने कोणताही हक्क सांगता येणार नाही.

१६. अर्ज एकदा ऑनलाईन सादर केल्यानंतर त्यामध्ये कोणतेही बदल करता येणार नाहीत याची नोंद घ्यावी.

१७. परिक्षा प्रवेश पत्र उमेदवारास संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात येईल. सदर पत्र पोष्टाने पाठवले जाणार नाही. परिक्षेच्यावेळी उमेदवारांनी प्रवेश प्रमाणपत्र आणणे अनिवार्य आहे. उमेदवाराने प्रवेशपत्राशिवाय स्वतःचे छायाचित्र असलेले ओळखपत्र जवळ बाळगणे आवश्यक राहील. (उदा.आधार कार्ड, पॅनकार्ड, निवडणूक ओळखपत्र, पासपोर्ट इत्यादी)

१८. सदरची परिक्षा ऑफलाईन पध्दतीने असल्याने उमेदवारांनी संकेतस्थळावर प्रसिध्द होणाऱ्या सुचनांची नोंद घेण्यासाठी वारंवार www.kopbankasso.com.in या वेबसाईटवर भेट देणे आवश्यक आहे. सदर परिक्षा कोल्हापूर जिल्हा नागरी बँक्स सहकारी असोसिएशन लि., कोल्हापूर या भरती एजन्सीमार्फत जिल्हा सिंधुदुर्ग येथे आयोजित केली जाणार आहे. लेखी परिक्षा प्रवेश पत्रात परिक्षा स्थळ नमूद केले जाईल.

१९. सदर शिपाई भरती ही अंतिम निवड करण्यात आलेल्या उमेदवारांमधून करण्यात येईल.

२०. नोकरभरती विषय सर्वाधिकार बँक व्यवस्थापनाकडे राखून ठेवत असून भरती प्रक्रिया संपुर्ण किंवा अंशतः रद्द करण्याचे अधिकार देखिल बँक राखून ठेवत आहे.

ठिकाण – सिंधुदुर्गनगरी
दिनांक – २०.०८.२०२६

अनिरूध्द यशवंत देसाई
मुख्य कार्यकारी अधिकारी
सिंधुदुर्ग जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि., सिंधुदुर्ग